कार्यालय पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद

सत्यमेव जयते

दिनांक ०५.१२.२०१८.

# प्रेसनोट

**श्री. अंगद कुंडलीकराव मुंढे, वय ५५ वर्ष, ग्रामसेवक, ग्राम पंचायत, भिकार सारोळा ता.जि. उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन स्वतः स्विकारल्याने त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही.**

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली त्याची थोडक्यात हकिगत अशी की - तक्रारदार यांनी स्वच्छ भारत योजना अंतर्गत शौचालय बांधले आहे. सदर शौचालयाचे १२,०००/- रुपये स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत जमा झाले आहेत. सदर केलेल्या कामाचे तसेच तक्रारदार यांच्या गावी वडिलांच्या नावावर असलेला प्लॉट तक्रारदार यांच्या नावावर करण्यासाठी व सदर प्लॉटचा फेर मंजुर करुन ८/अ चा उतारा देण्यासाठी लोकसेवक श्री. मुंढे, ग्रामसेवक, ग्राम पंचायत, भिकार सारोळा हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करीत आहेत.

त्यामुळे पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्रीकांत परोपकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. बी.व्ही.गावडे यांनी तक्रारीची शहानिशा करुन अे.सी.बी. युनिट, उस्मानाबाद टीमच्या सहाय्याने सापळा रचुन आज दि. ०५.१२.२०१८ रोजी लोकसेवक **श्री. अंगद कुंडलीकराव मुंढे, वय ५५ वर्ष, ग्रामसेवक, ग्राम पंचायत, भिकार सारोळा ता.जि. उस्मानाबाद** यांनी वर नमूद कामासाठी तक्रारदार यांचेकडुन **१०००/- रुपये** लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. पुढील कार्यवाहीकामी पोलीस निरीक्षक श्री. बहिर व श्री. आघाव हे मदत करीत आहेत. सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम २०१८ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. पुढील तपास श्री. बी.व्ही.गावडे, पोलीस उप अधीक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद हे करित आहेत.

अॅन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, अे.सी.बी. विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे** **www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, **टोल फ्री क्र. १०६४**, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९

**प्रति,**

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

05/12/18

**(बी. व्ही. गावडे)**

पोलीस उप अधीक्षक,

अॅन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.

Scanned by CamScanner